राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत पोंभुर्णा तालुक्यातील १५ गावे (जि.चंद्रपूर) प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः राग्रापे-२०१९/प्र.क्र.५०/पापु-१३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग

मंत्रालय, मुंबई-४००००१

तारीखः ६ मे,२०१९

वाचा

१) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. मजीप्रा/मुअना/तांशा-२/०८/१९ दिनांक २१.२.२०१९ रोजीचे पत्र.

२) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-दिनांक १७ मार्च,२०१०

३) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७/दिनांक ०९ ऑक्टोबर,२०१३

४) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक २२ जानेवारी,२०१४

५) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक ९ जुलै,२०१४

६) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक,१७ ऑक्टोबर २०१४

७) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु-०७,दिनांक १६ फेब्रुवारी,२०१५

८) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११११/प्र.क्र.१३४/पापु-०७, दिनांक २० फेब्रुवारी,२०१५

९) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १० मार्च,२०१५

१०) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून,२०१५

११) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे,२०१६

१२) शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१७ /प्र.क्र.१८६/पापु-१९, दिनांक ०६ ऑगस्ट,२०१८

प्रस्तावना -

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सन २०१८-१९ च्या वार्षिक कृती आराखडयात पोंभुर्णा तालुक्यातील १५ गावे (जि.चंद्रपूर) प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर योजनेचे अंदाजपत्रक संदर्भाधीन क्र.१ येथील पत्रान्वये प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केले आहे. सदर योजनेच्या अंदाजपत्रकास व आराखडयास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तसेच मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीच्या दिनांक ९.२.२०१९ च्या बैठकीत सदर योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे पोंभुर्णा तालुक्यातील १५ गावे (जि.चंद्रपूर) नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. २९,९४,६७,१९७/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यकमातंर्गत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, पोंभुर्णा तालुक्यातील १५ गावे (जि.चंद्रपूर) येथील ५५ लिटर दरडोई दरदिवशी क्षमतेच्या रु. ५९११/- इतका दरडोई खर्च असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. २९,९४,६७,१९७ /- (अक्षरी रुपये एकोणतीस कोटी चौ-याण्णव लाख सदुसष्ट हजार एकशे सत्त्याण्णव फक्त) इतक्या ढोबळ किमतीच्या अंदाजपत्रकास व आराखडयास राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत खालील अटी व शर्तींची पुर्तता करण्याच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे

I. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात यावी. योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. योजना यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे याची खात्री महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, चंद्रपूर यांनी करावी, तसेच योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी संदर्भाधीन क्र. ६ येथील दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.

II. योजनेची अंमलबजावणी होऊन कंत्राटदारा मार्फत योजना किमान एक वर्ष चालविण्यात येणार असली तरी ग्रामस्थांकडून या एक वर्षाचीही पाणी पट्टी वसूल करण्यात यावी. वसूल करण्यात आलेली पाणी पट्टी योजना चालविणा-या संस्थेस देण्यात यावी.

III. योजनेची कामे विहीत पध्दतीने **ई- निविदा** मागविण्यात येऊन करावीत. **जादा किंमतीच्या निविदा स्वीकृत करु नयेत.**

IV. योजनेसाठी आवश्यक भूसंपादन व इतर सर्व परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय योजनेस कार्यारंभ आदेश दिल्यास या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता रद्द समजण्यात येईल.

V. योजनेमध्ये १०० टक्के घरगूती नळ जोडण्यांचा व मीटरचा समावेश करण्यात यावा. तसेच किमान ८० टक्के नळजोडणी धारकाकडून स्वखर्चाने मीटर जोडणी घेणेबाबत हमीपत्र घेण्यात यावे व त्याची एक पत्र लॅमिनेट करुन नळ जोडणी धारकास द्यावी व एक प्रत ग्रामपंचायती कडे ठेवण्यात यावी. तद्नंतरच कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

VI. ग्रामसभा ठराव/हमीपत्र दिल्यानंतरही एखादया ग्रामस्थाने पाणी घेण्यास नकार दिला तरी त्याच्याकडून किमान ५० टक्के पाणी पट्टी वसूल करण्यात यावी. याबाबत ग्रामस्थांना निविदा प्रक्रियेच्या अगोदरच कल्पना देण्यात यावी व ग्रामसभेचा तसा ठराव घेण्यात यावा.

VII. सदर योजनेचा समावेश केंद्र शासनाच्या IMIS प्रणालीवर करण्यात यावा.

VIII. योजनेची कामे मंजूर किंमतीत कालबध्द व नियोजनबध्दरित्या टप्प्या-टप्प्याने पूर्ण करण्यात यावीत. योजनेचा उद्भव विकसित झाल्याशिवाय इतर कामे सुरु करु नयेत. उद्भवामध्ये पुरेसे पाणी उपलब्ध असल्याची खात्री केल्यानंतरच योजनेतील इतर कामे करावीत.

IX. योजना चालविणे व देखभाल दुरूस्ती यासाठी येणारा खर्च भागविण्याकरिता संबंधित ग्रामपंचायतीने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार घरगुती, बिगर घरगुती व संस्थात्मक नळ जोडणी धारकांसाठी पाणी पट्टीचा किमान दर निश्चित करावा व त्यात कालपरत्वे वाढ करण्यात यावी. सदर पाणी पट्टीच्या दराबाबत ग्रामस्थांची संमती आवश्यक आहे. सदर पाणी पट्टीचा दर ग्रामस्थांना मान्य नसल्यास निविदा काढण्यात येऊ नयेत.

X. वसूल करण्यात येणा-या पाणीपट्टी पैकी २० टक्के पाणीपट्टी ही मोठया देखभाल दुरुस्तीकरिता ठेवण्यात यावी. योजनेच्या पाईप्स या उपांगाची देखभाल दुरुस्ती प्रत्येक ५ वर्षांनी व इतर उपांगाची दुरुस्ती प्रत्येक ३ वर्षांनी करण्यात यावी.

XI. योजना चालविणे त्याचे परिरक्षण व देखभाल दुरुस्ती यासाठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीस / जिल्हा परिषदेस /महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शासनाकडून कोणतीही मदत / अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

XII. सदर योजनेतील सर्व गावे हागणदारीमुक्त असले तरी ते नहमीच हागणदारीमुक्त राहतील याबाबत खात्री करावी.

XIII. कोणत्याही कारणाने योजनेच्या खर्चात वाढ झाल्यास शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

XIV. सदर योजनेच्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटींची पुर्तता करण्यात यावी. तसेच संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयातील तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

XV. या विभागाच्या दिनांक १५ जून, २०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे अनिवार्य राहील.

XVI. योजना स्वयंनिर्भर होण्यासाठी आवश्यक पाणीपट्टी निश्चित करणे व त्यात आवश्यकतेनुसार वाढ करणे ग्रामपंचायतीस बंधनकारक राहील, याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामसभेत ग्रामस्थांना स्पष्टपणे सविस्तर माहिती द्यावी व त्यानंतरच योजनेच्या कामास सुरूवात करावी.

XVII. योजनेची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर संबधित अंमलबजावणी यंत्रणेने योजना पुर्णत्वाचा दाखला सक्षम प्राधिका-याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

XVIII. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये कोणत्याही स्वरुपाची अनियमितता, अपहार अथवा गैरव्यवहाराच्या बाबी निदर्शनास आल्यास अनियमिततेस जबाबदार संबंधित अधिकारी / कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र राहतील.

XIX. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता विहीत केलेली मानके पूर्ण करणे बंधनकारक राहील.

XX. योजनेच्या प्रगतीप्रमाणे खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे व योजनेच्या पूर्णत्वाचे संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून प्राप्त करुन घेऊन शासनास सादर करण्याची जबाबदारी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो) , बेलापूर यांची राहील.

२. या योजनेवर होणारा खर्च हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र व राज्य निधीतून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०७११२६४०१३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ram Apparao Sabane

Digitally signed by Ram Apparao Sabane
DN: CN = Ram Apparao Sabane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2019.05.07 14:35:17 +05'30'

(रा.अ.साबणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय ,मुंबई .
२. मा.राज्य मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई .
३. अपर मुख्य सचिव , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक , मंत्रालय मुंबई
४. सदस्य सचिव ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,एक्सप्रेस टॉवर्स,मुंबई २१,
५. विभागीय आयुक्त,नागपूर विभाग.
६. जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
७. संचालक ,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा ,भूजलभवन,शिवाजीनगर पुणे.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,चंद्रपूर.
९. महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता /लेखापरिक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई
१०.महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता /लेखापरिक्षा) महाराष्ट्र -२, नागपूर
११.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर,
१२.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था , सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१३.कार्यासन पापु -४ व पापु-२० पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (पापु-१३)